# दि. एशियाटीक सोसायटी ऑफ मुंबई.

## टाऊन हॉल, शहिद भगतसिंग रोड, मुंबई. 400 001

## नोंदणी क्र. ई-1020.

# *निवडणूक प्रक्रीया - 2025.*

❖ **निवडणूकीबाबत महत्वाच्या सुचना :-**

1. सर्व उमेदवार व मतदारांनी कायदा व सुव्यवस्थेचे पालन करावे.
2. प्रत्यक्ष मतदान प्रक्रीयेच्या आणि मतमोजणीच्या कालावधीत कोणीही गोंधळ अथवा कायदा व सुव्यवस्थेचे उल्लंघन करु नये. असे करतांना आढळल्यास संबंधीतांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
3. मतदारांनी मतदान करण्यास येताना संस्थेचे सभासद म्हणून असलेले मूळ ओळखपत्र सोबत असणे बंधनकारक आहे.
4. मतदाराने संस्थेच्या मंजूर नियम व नियमावली नुसार आणि दि. 03/10/2025 रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार खालीलप्रमाणे :-
   1. अध्यक्ष पदासाठी (पांढरी मतपत्रीका) - 1 मत
   2. उपाध्यक्ष पदासाठी (हिरवी मतपत्रीका) - 4 मते
   3. मानद सचिव पदासाठी (निळी मतपत्रीका) - 1 मत
   4. कार्यकारी मंडळाच्या पदासाठी (गुलाबी मतपत्रीका) - 6 मते
   5. पडताळणी समिती सदस्यपदासाठी (पिवळी मतपत्रीका) - 7 मते इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या नावासमोरील चौकटीमधे X अशी खुण करुन आपले मतदान नोंदविणे अपेक्षीत आहे.
5. वरील प्रत्येक पदासाठी नमूद मतांपेक्षा जास्त मते नोंदविल्याचे आढळून आल्यास अशी मतपत्रीका बाद ठरविण्यात येईल. तसेच चुरगळलेली, कुठलेही लिखाण किंवा स्वाक्षरी केलेली मतपत्रीका सुध्दा बाद ठरविण्यात येईल.
6. मतदाराने ज्या उमेदवाराला मतदान करावयाचे आहे. त्याच उमेदवाराच्या नावासमोरील चौकटीमधे X अशी खुण करुन आपले मतदान नोंदविणे अपेक्षीत आहे. चौकटीबाहेर किंवा दोन चौकटींच्या मधे X अशी खुण आढळून आल्यास ती मतपत्रीका बाद ठरविण्यात येईल अथवा त्याबाबतचा निर्णय घेण्याचे सर्व अधिकार निवडणूक अधिकारी यांचेकडे राहतील.
7. मतदान करुन झाल्यानंतर मतदान केंद्र असलेल्या इमारत परीसरामधे कोणीही थांबू नये.
8. मतदान प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर काही वेळाने मतमोजणी प्रक्रीयेला सुरुवात करण्यात येईल. तसेच मतमोजणी करतेवेळी स्वत: उमेदवार किंवा उमेदवारांनी लेखी नेमून दिलेल्या त्यांच्या एका प्रतिनिधीला उपस्थित राहता येईल.
9. दिव्यांग व्यक्तींना मतदान करण्यासाठी त्यांचे कुटूंबातील किंवा मतदारांपैकी एका व्यक्तीची त्यांना मदत घेता येईल. परंतु, त्या मदतगारास फक्त एकाच दिव्यांग व्यक्तीला मदत करता येईल.
10. मतदान केंद्र व मतमोजणी केंद्र यामधे संपूर्ण प्रक्रीयेदरम्यान भ्रमणध्वनी (Mobile) अथवा तांत्रीक साहित्य (Electronic Devices) वापरास आणि त्याव्दारे छायाचित्र किंवा चित्रीकरण (Videography) करण्यास उमेदवार, मतदार अथवा कुणीही सामान्य (निवडणूक अधिकारी यांनी नेमलेला व्यक्ती वगळता) व्यक्ती यांना पुर्णत: मनाई करण्यात येत आहे. असे करताना आढळल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

11. वरील सर्व सुचनांचे काटेकोरपणे पालन करुन निवडणूकीकामी कार्यरत असलेल्या सर्व कर्मचा-यांना सहकार्य करावे.

12. मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दि. 13.03.2026 रोजीचे आदेश, न्यासाची मंजूर नियम व नियमावली आणि दि.03/10/2025 रोजी घोषीत करण्यात आलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार सदरची मतदान प्रक्रीया व मतमोजणी प्रक्रीया घेण्यात येत आहे.. तरी निवडणूक अधिकारी यांचा निर्णय अंतीम राहिल. याची सर्व उमेदवार व मतदारांनी नोंद घ्यावी. ही विनंती.

THE ASIATIC SOCIETY OF MUMBAI
Town Hall
Mumbai-1

K. D. Talokar
Election Officer
The Asiatic Society of Mumbai